# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५**

ई-मेलः mercindia@merc.gov.in
वेब-साईट www.merc.gov.in

**२३ जानेवारी २०२३**

## मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना :** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(३) अन्वये आयोगाला आपल्या कामकाजात पारदर्शकता राखण्याचे बंधनकारक केले आहे. प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करुन, इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सुनावणीमध्ये भाग घेणे शक्य व्हावे यासाठी, आयोगाने, सर्व संबंधितांकरिता आपल्या संकेत-स्थळावरुन लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे सुनावणी घेणे सुरु केले आहे. आयोगाने, न्यायालयीन कामकाजाच्या स्वरुपात असलेल्या या सुनावण्या सुरळीतपणे पार पडाव्यात यासाठी आणि या सुनावण्यांदरम्यान पाळावयाच्या शिष्टाचारासंबंधात अनुसरावयाच्या अनेक कार्यपध्दती (दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ चे कार्यप्रणाली निर्देश) देखील पारदर्शकपणे लागू केल्या आहेत. ही मार्गदर्शक सूचना संबंधितांच्या सुलभतेसाठी अशा प्रक्रियेला अधिक स्पष्ट करण्यासाठी जारी केली जात आहे, ज्यामुळे त्यांचा सहभाग सुलभ आणि त्रास-विरहित होईल.

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग सुनावणी/जन सुनावणी प्रक्रियेत संबंधितांना सुलभ प्रक्रियेद्वारे सहभागी करुन घेण्यासाठी विविध तांत्रिक उपायांचा अवलंब करीत आहे.

२. कोविड - १९ महामारीच्या कालावधीपासून, आयोग इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सुनावणी आयोजित करीत आहे, ज्यामुळे संबंधितांना सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी मुंबईत येण्याची गरज पडत नसून त्यांना त्यांच्या परिसरातूनच सुनावणीत सहभागी होता येते.

३. त्याशिवाय, आयोग ह्या सुनावण्या आयोगाच्या संकेत-स्थळावर थेट प्रक्षेपित (लाईव्ह स्ट्रीम्ड) करते, ज्यामुळे अशा ई-सुनावण्यांमध्ये मोठ्या संख्येने संबंधित व्यक्ती उपस्थित राहू शकतात. हे लाभ विचारात घेऊन, आयोगाने ई-सुनावणी हे आपल्या कामकाजाचे नियमित मूलभूत वैशिष्ट्य बनवले आहे.

४. मागील २ वर्षांपासून, आयोगाने इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सर्व सुनावण्या आयोजित केल्या आहेत. आयोगाने आतापर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सुगम्यते संबंधातील कोणत्याही तक्रारीविना -- ई-सुनावण्या आणि -- ई-जन सुनावण्या पार पाडल्या आहेत. अनेकांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या वापराची सुलभता आणि परिणामकारकता याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. अशा इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या वापरामुळे आयोगाला ग्राहकांच्या उबंरठ्यापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे.

५. आयोगाने याआधी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी ई-जाहीर सुनावणी प्रक्रिया आणि ई-सुनावणी/ई-जन सुनावणी प्रक्रियेदरम्यान अनुसरावयाचे नियम यासंबंधात कार्यप्रणाली निर्देश जारी

केले आहेत. मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ च्या विनियम १८ आणि १२ अंतर्गत जारी केलेले हे कार्यप्रणाली निर्देश ई-सुनावणी सुरळीत पार पाडण्यासाठी पालन करावयाचे तपशील नमूद करतात.

६. आयोग जाहीर सुनावण्यांसाठी अशाच ई-सुनावणी प्रक्रियेचा वापर करीत आहे आणि वीज दर याचिकांवरील जाहीर सुनावण्यांसाठी आता त्याच प्रक्रियेचा वापर करणार आहे ज्यामुळे ग्राहकाला त्याच्या सोयीच्या ठिकाणावरुन ई-जन सुनावणीमध्ये सहभागी/साक्षीदार होणे शक्य होईल. ही मार्गदर्शक टिपणी ई-जन सुनावणीची प्रक्रिया आणि वीज दर याचिकांवरील, विशेषत्वाने वितरण परवानाधारकांसाठीच्या, सुनावणी दरम्यान अवलंबावयाच्या पध्दतींबाबत अधिक स्पष्टीकरण देण्यासाठी निर्गमित करण्यात येत आहे, ज्यामध्ये सहभागी होणाऱ्या ग्राहकांची संख्या अधिक असेल.

७. वीज दर याचिकांवर जनतेशी सल्लामसलत आणि ई-जन सुनावणी प्रक्रिया यासाठी खालील प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल :

७.१ वीज दर याचिकांवर सूचना आणि हरकती दाखल करणे :

ए. विद्युत कंपन्यांनी जाहीर सूचना जारी केल्यानंतर, हितसंबंधित वीज दर याचिकांवरील त्यांच्या सूचना आणि हरकती निर्धारित कालावधीत सादर करु शकतात.

बी. सदर सूचना आणि हरकती आयोगाच्या https://merc.gov.in/e-public-consultation या संकेत-स्थळावर (मुखपृष्ठ) ठळकपणे प्रदर्शित असलेल्या 'e-public consultation' टॅबवर प्राधान्याने ऑनलाईन स्वरुपात सादर करण्यात याव्यात.

सी. सूचना आणि हरकती सादर करण्याच्या या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. एका मोबाईल क्रमांकावरुन, एक व्यक्ती तीन वेळा त्याचे निवेदन दाखल करु शकेल म्हणजेच, १) नियत दिनांकापूर्वीचे मूळ निवेदन २) नियत दिनाकांपूर्वीचे अतिरिक्त निवेदन, आणि ३) जन सुनावणीच्या दिनांकानंतर ३ दिवसांच्या आत, असल्यास, प्रतिउत्तर.

डी. नेहमीच्या प्रक्रियेनुसार, सहभागी/हितसंबंधित ई-जन सुनावणीमध्ये आपले म्हणणे मांडण्याचा पर्याय निवडू शकतात. ज्या व्यक्तींनी आपल्या सूचना आणि हरकती लेखी स्वरुपात सादर केल्या असतील त्यांनाच फक्त आपले म्हणणे मांडण्याची परवानगी देण्यात येईल. जी व्यक्ती ई-जन सुनावणी दरम्यान आपले म्हणणे मांडू इच्छित असेल त्याने आयोगाच्या संकेत-स्थळावरील 'e-public consultation' या टॅबवरील तसा पर्याय निवडावा. वक्त्याने त्याच्या लेखी निवेदनामध्ये उपस्थित केलेल्या प्रमुख मुद्यांपुरते आणि ठळकपणे तेच मांडण्याच्या मर्यादेपर्यंत स्वतःला मर्यादित ठेवण्याची अपेक्षा आहे.

इ. जे सहभागी/हितसंबंधित त्यांच्या परिसरामधून आपले म्हणणे मांडू इच्छितात, त्यांच्यासाठी ई-मेल आयडी देणे अनिवार्य राहील. ई-सुनावणीमध्ये सहभागी होण्यासाठीची लिंक अशा नोंदणीकृत ई-मेलवरच फक्त पाठविण्यात येईल.

एफ. ज्या व्यक्तीकडे ई-मेल आयडी नसेल परंतु ई-सुनावणी दरम्यान आपले म्हणणे मांडण्याची इच्छा असेल तर, त्याला 'मविनिआ सुविधा केंद्रा'मधून जन सुनावणीस प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचा पर्याय उपलब्ध असेल. ही सुविधा केंद्रे, शक्य असेल तेथवर, मागील वीज दर याचिकांवर अशा सुनावण्या ज्या ठिकाणी घेण्यात आल्या त्याच ठिकाणी असतील. सुनावण्यांच्या ८ दिवस आधी सुविधा केंद्रांचा तपशील कळविण्यात येईल.

जी. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर 'e-Public Consultation' प्लॅटफॉर्मवर नोंद झालेल्या 'wish to speak' पर्यायाच्या आधारे सुनावणीमध्ये आपले म्हणणे मांडणाऱ्या व्यक्तींची यादी बनवण्यात येईल. सदर यादी बनवण्यासाठी नियत दिनांकापूर्वी प्राप्त झालेल्या निवेदनांची वेळ व तारीख घेण्यात येईल. नियत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

एच. 'e-Public Consultation' टॅबवर सूचना आणि हरकती सादर करताना, संबंधित हमीपत्राचा 'स्वीकार' करतील आणि हमीपत्राच्या चेकबॉक्सवर 'क्लिक' करतील. हितसंबंधी हमी देतील की, 'e-Public Consultation' टॅबवर सादर केलेला मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी वक्त्याचा/परिचिताचा आहे, आणि तो/ती ई-जन सुनावणीमध्ये सहभागी होण्यासाठी पुरविण्यात आलेल्या लिंकचा गैरवापर करणार नाही किंवा अन्य व्यक्तींना अशा लिंकचा गैरवापर करु देणार नाही तसेच तो/ती घालून दिलेल्या शिष्टाचाराचे पालन करील.

आय. आयोगाच्या संकेत-स्थळावरील 'e-Public Consultation' या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल करण्यात कोणतीही अडचण येत असल्यास आयोगाची आयटी टीम संबंधितांना सहाय्य करील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८० ७१५२२ (एसएमएस किंवा व्हॉट्स ॲप) किंवा suggestions@merc.gov.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात. सहभागी/संबंधितांना सूचना आणि हरकती डिजिटल नमुन्यात, ऑनलाईन सादर करणे शक्य होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान टिमद्वारे मार्गदर्शन केले जाईल.

जे. ज्या व्यक्तींनी आयोगाच्या 'e-Public Consultation' या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल केल्या असतील त्यांना त्यांच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही.

के. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही ते त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत नियत दिनांकापूर्वी आयोग/विद्युत कंपनीच्या कार्यालयास प्राप्त होतील याची खातरजमा करुन दाखल करु शकतात आणि त्यामध्ये ई-जन सुनावणी दरम्यान म्हणणे मांडू इच्छित असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करावे. अशा सूचना आणि हरकती आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून डिजिटल फॉरमॅटमध्ये रुपांतरीत करण्यात येतील

आणि वक्त्यांनी सूचना आणि हरकती ऑनलाईन दाखल केल्यानंतर यादी बनवण्यासाठी विचारात घेण्यात येतील.

७.२ वीज दर याचिकांवरील ई-जन सुनावणी :

ए. ई-जन सुनावणी MS-Teams Platform द्वारे आयोजित करण्यात येईल.

बी. ई-जन सुनावणीमध्ये ज्या व्यक्तीला त्याच्या परिसरातून आपले म्हणणे मांडावयाचे असेल त्याच्याजवळ दृक-श्राव्य सुविधा असलेला संगणक/लॅपटॉप आणि चांगल्या दर्जाची इंटरनेट जोडणी असावयास हवी.

सी. आयोगाकडून ई-जन सुनावणीमध्ये सहभागी होण्यासाठी लिंक आणि लॉग इन क्रिडेन्शिअल (MS Teams च्या मान्यताप्राप्त परवान्याची व्यवस्था आयोगाकडून करण्यात येईल) देण्यात येईल. ज्या व्यक्तींनी सूचना आणि हरकतीमध्ये आपले म्हणणे मांडण्याची इच्छा व्यक्त केली असेल त्या संबंधितांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर फक्त सदर लिंक पाठविण्यात येईल. जर सुनावणीच्या एक दिवस आधी लिंक प्राप्त न झाल्यास सहभागी वरील ७.१ (आय) मध्ये देण्यात आलेल्या मोबाईल क्रमांक, व्हॉट्स ॲप वर आयोगाच्या कार्यालयात संपर्क साधू शकतील.

डी. अन्य सर्व आयोगाच्या https://new.merc.gov.in/ live-stream या संकेत-स्थळावरील मुखपृष्ठावर देण्यात आलेल्या 'Live streaming link' द्वारे ई-जन सुनावणीस उपस्थित राहू शकतात.

इ. ई-जन सुनावणीमध्ये म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित राहण्याकरिता ज्या व्यक्तींकडे कोणतीही सुविधा (संगणक/लॅपटॉप आणि इंटरनेट जोडणी) नाही अशा व्यक्तींसाठी 'मविनिआ सुविधा केंद्र' स्थापन करण्यात येणार आहे. मुंबई येथील सुविधा केंद्र सर्व वीज दर याचिकांवरील ई-जन सुनावणीसाठी उपलब्ध राहील. याशिवाय, महावितरण कंपनीच्या वीज दर याचिकेवरील ई-जन सुनावणीसाठी, आयोग सहा महसुली विभागांमध्ये म्हणजेच, अमरावती, औरंगाबाद, पुणे, नागपूर, नवी मुंबई आणि नाशिक येथे सुविधा केंद्रांची उभारणी करील.

एफ. जाहिर सूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांका रोजी ई-जन सुनावणी आयोजित करण्यात येईल. तथापि, कोणत्याही अपरिहार्य परिस्थतीत किंवा आपले म्हणणे मांडण्याची इच्छा व्यक्त केलेल्या सर्व व्यक्तींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यासाठी एका पेक्षा जास्त सत्र चालविण्याची आवश्यकता भासल्यास, ई-जन सुनावणीसाठी सुधारित/अतिरिक्त दिनांक आणि सत्राची वेळ आयोगाच्या संकेत-स्थळावर ४ दिवस आधी प्रसिध्द करण्यात येईल.

जी. संबंधितांना ई-जन सुनावणी प्रक्रियेची ओळख व्हावी यासाठी, ज्या हितसंबंधितांनी त्यांच्या परिसरातून आपले म्हणणे मांडण्यासाठी नोंदणी केली असेल त्यांच्यासाठी मविनिआ आयटी टीम चाचणीचे (टेस्ट रन) आयोजन करील. अशी टेस्ट रन सुनावणीच्या किमान ३ दिवस आधी आयोजित करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी

त्यांना दिलेल्या वेळी टेस्ट रनसाठी उपस्थित रहावे. टेस्ट रनचा तपशील किमान २ दिवस आधी आयोगाच्या संकेत-स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. टेस्ट रन दरम्यान, हितसंबंधिताचा संगणक किंवा इंटरनेट सुविधा ई-जन सुनावणी माध्यमासाठी सक्षम नसल्याचे आढळून आली तर, अशा व्यक्तीस आयोगाच्या सुविधा केंद्रामधून ई-जन सुनावणीस उपस्थित रहावे. सर्व सहभागींना कळविण्यात येते की, जी व्यक्ती सुनावणी दरम्यान आपले म्हणणे मांडू इच्छित असेल तिने ई-सुनावणीची प्रक्रिया समजून घेण्यासाठी टेस्ट-रनला उपस्थित राहावे. जी व्यक्ती टेस्ट-रनमध्ये सामील होणार नाही आणि ई-जन सुनावणीच्या दिवशी तिला काही अडचण आल्यास, आयोग, अशा व्यक्तीस प्रतिसाद देऊ शकणार नाही.

एच. ई-जन सुनावणीमध्ये आपले म्हणणे मांडणाऱ्या व्यक्तींची दिन-निहाय/सत्र-निहाय यादी जन-सुनावणीच्या निर्धारित दिनांकाच्या किमान ३ दिवस आधी आयोगाच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करण्यात येईल. सर्व हितसंबंधितांना विनंती करण्यात येते की, त्यांनी दिलेल्या वेळी सत्रामध्ये सहभागी होण्यासाठी आयोगाचे संकेत-स्थळ तपासून पहावे आणि दिलेल्या वेळी सत्र लॉग इन करावे. सदर व्यक्तींनी त्यांना देण्यात आलेली वेळ पाळावी, जेणेकरुन सत्रा दरम्यान सर्व वक्त्यांचे म्हणणे ऐकणे शक्य होईल. वक्त्यांची नावे कालक्रमानुसार पुकारण्यात येतील आणि ज्या वक्त्याचे नाव पुकारण्यात आले आहे तो वक्ता उपलब्ध नसल्यास कालक्रमानुसार शेवटच्या वक्त्याने आपले म्हणणे मांडल्यानंतरच त्याला संधी देण्यात येईल.

आय. ई-जन सुनावणी दरम्यान आपले म्हणणे मांडणाऱ्या सहभागींची संख्या जास्त असल्यास आणि सूचना आणि हरकतींमधील सर्व विषय समाविष्ट करणे शक्य होण्यासाठी, आयोग, एकाच स्वरुपाच्या असलेल्या सूचना आणि हरकती एका गटामध्ये एकत्रित (club/tag) करील आणि या गटातील फक्त काही प्रतिनिधींना (विशिष्ट विषय समाविष्ट करुन) ई-जन सुनावणी दरम्यान बोलण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे अन्य सहभागींना, जनतेशी सल्लामसलती अंतर्गत वीज दर याचिकेवरील त्याच मुद्यावर आणि अन्य मुद्यांवर, त्यांचे दृष्टीकोन मांडणे शक्य होईल. असे करताना, आयोग, याचिकेवर निर्णय देताना सर्व लेखी सूचना आणि हरकतींचा आपल्या आदेशात विचार करील.

जे. सुनावणी दरम्यान आपले म्हणणे मांडण्याची इच्छा नसणारे संबंधित, आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात आलेल्या लाईव्ह स्ट्रीमिंग लिंकद्वारे ई-जन सुनावणीस उपस्थित (पाहू आणि ऐकू शकतील) राहू शकतात.

के. जर लाईव्ह स्ट्रीमिंग लिंक द्वारे ई-जन सुनावणीस उपस्थित राहिलेली व्यक्ती सुनावणी दरम्यान कोणताही मुद्दा/मुद्यांवर आपले म्हणणे मांडू इच्छित असल्यास, अशा व्यक्तीने ई-जन सुनावणी व्यासपिठावरील Q&A Section मध्ये तशी विनंती करावी तसेच त्याने त्याचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आणि ज्या मुद्यांवर त्यास म्हणणे मांडावयाचे आहे तो प्रश्न, असा तपशील देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छाधिकारानुसार, अशा व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यासाठी स्वतंत्र दिनांक आणि वेळ देईल.

एल. 'मविनिआ सुविधा केंद्रावर' ई-जन सुनावणीस उपस्थित असलेल्या व्यक्तीने वक्ता म्हणून आधी नोंद केलेली नसेल परंतु त्यास त्याचे म्हणणे मांडावयाचे असेल तर, तो तसा अर्ज त्यास कोणत्या प्रश्नावर त्याचे म्हणणे मांडावयाचे आहे ते नमूद करुन, सुविधा केंद्रातील आयोगाच्या समन्वयकाकडे देऊ शकेल. आयोग अशा व्यक्तीस, आधीच्या सर्व नोंदणीकृत वक्त्यांनी त्यांचे म्हणणे मांडल्यानंतर, वेळेच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, त्याचे म्हणणे मांडण्यास परवानगी देईल.

एम. ई-सुनावणी दरम्यान, सर्व सहभागी, जोपर्यंत आयोगाचे प्रतिनिधी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांचे नाव पुकारत नाहीत तोपर्यंत, त्यांचे कॅमेरा/माईक बंद ठेवतील. त्यांचे नाव पुकारण्यात आल्यानंतर, ते कॅमेरा/माईक चालू करुन त्यांचे म्हणणे मांडण्यास सुरुवात करतील.

७.३ ई-सुनावणी सुविधेद्वारे त्यांच्या संबंधित याचिकांमध्ये उपस्थित राहणाऱ्या आणि म्हणणे मांडणाऱ्या व्यक्तींनी, जसे की ते कोणत्याही न्यायालयीन कामकाजात सहभागी होत आहेत त्याप्रमाणे, उचित वेषभूषा नियम आणि शिष्टाचार यांचे पालन करणे अनिवार्य राहील.

७.४ विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९५ नुसार, ई-जन सुनावणी ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ आणि २२८ च्या अर्थांतर्गत न्यायालयीन कामकाज म्हणून मानण्यात येईल आणि आयोग हे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३४५ आणि ३४६ च्या प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालय म्हणून मानण्यात येईल. त्यानुसार, जर कोणीही व्यक्ती ई-जन सुनावणीच्या सुरळीत कामकाजामध्ये हेतूपुरस्सर अडथळा निर्माण करीत असल्यास, अशा व्यक्तीला ई-जन सुनावणीमधून काढून टाकण्याव्यतिरिक्त, आयोग अशा व्यक्तीविरुध्द कायद्या अंतर्गत विहित केल्यानुसार कारवाई करु शकतो.

७.५ ई-जन सुनावणीमध्ये अवलंबावयाच्या कामकाज प्रक्रिया आणि प्रोटोकॉल यांचेशी संबंधित दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजीचे कार्यप्रणाली निर्देश सोबत जोडलेले आहेत. ई-जन सुनावणीमध्ये भाग घेताना संबंधित त्याचे अनुसरण करतील.

मा. आयोगाच्या परवानगीने निर्गमित

(Abhijit Deshpande)
Secretary

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION
॥आदित्य हृदयम॥

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५**

ई-मेलः mercindia@merc.gov.in

वेब-साईट www.merc.gov.in

# कार्यप्रणाली निर्देश

## आयोगासमोर याचिकेच्या ई-फायलिंग आणि ई-सुनावणीसाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल

**दिनांक : १४ नोव्हेंबर, २०२२**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (मविनिआ किंवा आयोग) दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ अधिसूचित केले आहेत. सदर अधिसूचनेसह मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ आणि त्यामध्ये जारी केलेले कार्यप्रणाली निर्देश/कार्यपध्दती कामकाजाचे नियम विनियम २०२२ ने बदलण्यात आल्याचे मानण्यात येते.

२. मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ च्या विनियम १८ आणि २२ नुसार याचिकेचे ई-फायलिंग आणि त्या याचिकेवरील ई-सुनावणी यासाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल निर्गमित करणे आवश्यक आहे.

३. आयोगाने आधीच्या विनियमांतर्गत कार्यप्रणाली निर्देश निर्गमित करुन मागील २ ते ३ वर्षांपासून आपल्या कामकाजात ई-फायलिंग आणि ई-सुनावणी प्रक्रिया स्वीकारली आहे. मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ अधिसूचित करताना, सदर कार्यप्रणाली निर्देशातील तरतुदी या विनियमांमध्ये समाविष्ट केल्या आहेत. आता मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ चे विनियम ३८ लागू करुन, या कार्यप्रणाली निर्देशाद्वारे, सर्व संबंधितांना सहज समजण्यासाठी ई-फायलिंग आणि ई-सुनावणीसाठी परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल तयार केले जात आहेत.

४. याचिका ई-फायलिंग करणेः

४.१ मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ च्या विनियम १८ नुसार याचिका केवळ 'ई-फायलिंग पोर्टल' द्वारेच दाखल करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हीच पध्दती पक्षकारांनी उत्तरे/प्रतिउत्तरे/वादकालीन अर्ज दाखल करण्यासाठी लागू आहे.

४.२ लेखी वादप्रतिवाद (Pleadings) फक्त सॉफ्ट कॉपी (Word आणि PDF) मध्ये दाखल केले जातील. छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही.

४.३ ई-फायलिंग पोर्टल द्वारे याचिका दाखल करताना पक्षकारांनी संपूर्ण याचिका आणि त्याचा सारांश/गोषवारा, प्रकरणाची वस्तुस्थिती आणि आधारकारण, जोडपत्रे तसेच विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यानुसार स्वाक्षांकित प्रतिज्ञापत्र यांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करणे आवश्यक आहे.

४.४ परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीला डिजिटल तंत्रज्ञान वापरण्यात अडचण येत असल्यास, आयोगाचा कर्मचारी वर्ग अशी याचिका डिजिटल स्वरुपात रुपांतरीत करण्यात मदत करेल आणि ई-फायलिंग पोर्टल'द्वारे त्यावर प्रक्रिया करेल.

४.५ तातडीची सुनावणी/याचिकेचा उल्लेख करण्याच्या अर्जासाठीची विनंती, तातडीचे समर्थन करुन, वादकालिन अर्ज म्हणून दाखल करणे आवश्यक राहील.

४.६ 'https://e-filing.merc.gov.in' द्वारे 'E-filing Portal' मध्ये प्रवेश करता येईल. संबंधितांना सहज समजण्यासाठी वापरकर्त्यांसाठी सूचना/FAQ या वेबपृष्ठावर उपलब्ध आहेत.

५. <u>याचिकेवर ई-सुनावणी घेणे</u>

५.१ मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ च्या विनियम २२ नुसार, आयोग, डिफॉल्ट पर्याय म्हणून निर्देशित व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सॉफ्टवेअरचा वापर करुन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून दूरस्थ प्रवेशाद्वारे (ई-सुनावणी) कामकाज चालविल. तथापि, कोणताही पक्षकार प्रत्यक्ष सुनावणीचा पर्याय, त्याविषयीचे समर्थन देऊन, स्वीकारु शकेल, अशा प्रकरणी हायब्रिड सुनावणी (प्रत्यक्ष सुनावणी आणि रिमोट ॲक्सेसद्वारे (डिजिटल) सुनावणी घेण्यात येईल.

५.२ आयोगासमोरील सर्व सुनावण्यांचे, शक्य असेल तेथवर, आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात यावयाच्या लिंकद्वारे इंटरनेटवर थेट प्रसारण (लाईव्ह स्ट्रिमिंग) करण्यात येईल. तथापि, काही विशिष्ट प्रकरणामध्ये, लेखी कारणे नोंदवून, आयोग प्रकरणांच्या सुनावणीच्या लाईव्ह स्ट्रिमिंगवर निर्बंध घालू शकेल.

५.३ ज्या ॲडव्होकेट्स/पक्षकारांची प्रकरणे विशिष्ट दिवशी ई-सुनावणी/उल्लेख करण्यासाठी सूचीबध्द करण्यात आली आहेत फक्त त्यांनाच दृक-श्राव्य इनपुट्सची लिंक देण्यात येईल. संबंधित पक्षकाराच्या ॲडव्होकेट्ससह जास्तीत जास्त ३ व्यक्तींना ई-सुनावणीमध्ये सहभागी होण्याची परवानगी देण्यात येईल. अन्य सर्व आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात आलेल्या लाईव्ह स्ट्रिमिंग लिंकद्वारे ई-सुनावणीस उपस्थित राहू शकतील.

५.४ ई-सुनावणी प्रकरणी, ई-सुनावणी दरम्यान आपले म्हणणे मांडण्याचा पर्याय निवडणाऱ्या व्यक्तींच्या संख्येच्या आधारावर, म्हणणे मांडण्याची संधी आणि ई-सुनावणी सुरळीतपणे पार पाडण्यासाठी, खालील उपाययोजना करण्यात येतील:

ए. प्रत्येक पक्षकाराला दृक-श्राव्य इनपुट्सच्या हक्कासह फक्त एकच लिंक देण्यात

येईल.

बी. सर्व इच्छुक अर्जदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळण्याकरिता प्रत्येक वक्त्याला मर्यादित वेळ देण्यात येईल.

सी. वक्त्यांची संख्या जास्त असल्यास, ई-जन सुनावणी एकाच दिवशी किंवा वेगवेगळ्या दिवशी बहुविध सत्रांत घेण्यात येईल. ई-जन सुनावणी बहुविध सत्रांत/बहुविध दिनांकास घेण्यात येत असल्यास, संबंधित वक्त्याला देण्यात आलेले सत्र आणि दिनांक याविषयी किमान ३ दिवस आधी त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर आणि/किंवा ई-मेल आयडीवर किंवा आयोगाच्या संकेत-स्थळावर वक्त्यांची सत्र-निहाय यादी अपलोड करुन कळविण्यात येईल.

डी. ई-जन सुनावणीत सुलभ प्रक्रियेद्वारे सहभागी करुन घेण्यासाठी, राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी तात्पुरत्या तत्वावर सुविधा केंद्रे स्थापन करण्यात येतील. अशा प्रकरणी, ई-जन सुनावणीची सत्रे ठिकाण-निहाय नियोजित करण्यात येईल. ई-जन सुनावणीमध्ये सहभाग घेण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा नसणाऱ्या व्यक्ती ई-जन सुनावणीमध्ये सहभाग घेण्यासाठी, आपले म्हणणे मांडू इच्छिणारा अर्जदार म्हणून त्यांच्या पूर्व-ओळखीच्या (prior identification) अधीन राहून, सुविधा केंद्रांचा वापर करु शकतात.

इ. सूचना आणि हरकती मागविलेल्या जाहीर नोटीशीमध्ये नमूद केलेल्या नियत दिनांकाच्या आत याचिकेवर प्राप्त झालेल्या अर्जामध्ये ज्या अर्जदारांनी आपले म्हणणे मांडण्याची विनंती केली आहे त्यांना ई-जन सुनावणीमध्ये सहभागी होण्यासाठी लिंक देण्यात येईल. अन्य सर्व आयोगाच्या संकेत-स्थळावर दिलेल्या लिंकद्वारे ई-जन सुनावणीत उपस्थित राहू शकतात.

एफ. नियत दिनांकानंतर किंवा ई-जन सुनावणी प्रक्रिये दरम्यान ज्या अर्जदारांची आपले म्हणणे मांडण्याची विनंती प्राप्त झाली आहे अशा अर्जदारांना, आयोग, आपल्या स्वेच्छाधिकारानुसार, लिंक जारी करण्याची परवानगी देऊ शकेल.

५.५ ई-सुनावणी सुविधेद्वारे आपल्या संबंधित प्रकरणात उपस्थित राहणाऱ्या आणि म्हणणे मांडणाऱ्या ॲडव्होकेट्स/ पक्षकारांनी वेषभूषा नियम आणि शिष्टाचार यांचे पालन करणे अनिवार्य राहील.

५.६ विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९५ नुसार, *“ई-जन सुनावणी ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ आणि २२८ च्या अर्थांतर्गत न्यायालयीन कामकाज म्हणून मानण्यात येईल आणि आयोग हे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३४५ आणि ३४६ च्या प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालय म्हणून मानण्यात येईल. त्यानुसार, जर कोणीही व्यक्ती ई-जन सुनावणीच्या सुरळीत कामकाजामध्ये हेतूपुरस्सर अडथळा निर्माण करीत असल्यास, अशा व्यक्तीला ई-जन सुनावणीमधून काढून टाकण्याव्यतिरिक्त, आयोग अशा व्यक्तीविरुध्द कायद्या अंतर्गत विहित केल्यानुसार कारवाई करु शकतो.”*

५.७ ई-सुनावणीसाठी अनुसरावयाची सविस्तर पध्दती यासोबत जोडण्यात आली आहे.

६. ही परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल भविष्यात निर्माण होणाऱ्या कोणत्याही परिचालनात्मक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वेळोवेळी अद्ययावत करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **(मुकेश खुल्लर)** | **(आय. एम. बोहरी)** | **(संजय कुमार)** |
| **सदस्य** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

**(अभिजीत देशपांडे)**
**सचिव**

## जोडपत्र

## ई-सुनावणीसाठी सविस्तर कार्यपध्दती

१. सर्वसाधारण निर्देश:

१.१ ई-सुनावणीच्या संबंधातील अधिसूचना, परिपत्रके, ई-सुनावणी/ई-जन सुनावणीसाठीच्या नियोजित तारखा, पूरकपत्र/पूरकपत्रे, शुध्दीपत्रक/शुध्दीपत्रके इ. सह सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या अधिकृत संकेत-स्थळावर म्हणजेच 'https://www.merc.gov.in' वर प्रसिध्द करण्यात येईल.

१.२ आयोग आपल्या संकेत-स्थळावर सर्व प्रकरणांसाठीचे वेळापत्रक आणि सत्राची वेळ अधिसूचित करील.

१.३ ई-सुनावणी प्राथमिक व्हिडिओ कॉन्फरन्सिंग माध्यम म्हणून 'Microsoft Teams app' च्या द्वारे घेण्यात येईल. या संबंधीचा आवश्यक तपशील आयोगाच्या आयटी टीमकडे उपलब्ध राहील आणि आयोगाच्या संकेत-स्थळावर देखील तो प्रदर्शित करण्यात येईल. संबंधित पक्षकारांना ई-मेल द्वारे देखील याबाबत कळविण्यात येईल.

१.४ याचिकाकर्ता / प्रतिवादी / पक्षकार आयोगाच्या सचिवालयाच्या e.ehearing@merc.gov.in या अधिकृत ई-मेल आयडीवर आयोगासमोरील कामकाजाच्या पत्रव्यवहारासाठी ई-मेल पाठवतील.

२. शिष्टाचार, वेषभूषा आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर:

२.१ आयोगाने मान्यता दिलेल्या कोणत्याही प्रकरण-सापेक्ष सवलतीच्या अधीन राहून, ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी ई-सुनावणी सुविधेद्वारा त्यांच्याशी संबंधित प्रकरणी उपस्थित राहताना आणि म्हणणे सादर करताना वेषभूषा आणि शिष्टाचार यांचे पालन करणे अनिवार्य राहील.

२.२ ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी सभोवतालच्या उचित वातावरणात, जेथे पार्श्वभूमीवरील आवाज किंवा गडबड/गोंधळ (जसे की, मोबाईलची रिंग वाजणे, पाठीमागून कुजबूज करणे इ.) होणार नाही याची खात्री करुन, ई-सुनावणीसाठी बसावे.

२.३ ॲडव्होकेट्स/पक्षकार यांनी प्राधान्याने हेडसेट्स/इयरफोन यांचा वापर करावा. कार्यवाही दरम्यान आपल्या बाजूने शिस्त पाळली जाईल आणि गैरसोय किंवा त्रास होणार नाही याबाबत खबरदारी घेण्याची जबाबदारी ॲडव्होकेट्स/पक्षकार यांची असेल.

२.४ ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी विहित दिनांक आणि वेळ तसेच उपरोल्लेखित निर्देश यांचे काटेकोरपणे पालन करावे.

२.५ ॲडव्होकेट्स/पक्षकारांना युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध नसल्यास, आयोगाच्या निर्देशाच्या अधीन राहून, अतिरिक्त वेळ दिला जाऊ शकतो किंवा प्रकरण तहकूब केले जाऊ शकते.

२.६ प्रसारणाची गुणवत्ता किंवा श्रवणक्षमता यांच्या संदर्भातील कोणतीही तक्रार संबंधित पक्षकाराकडून **"Microsoft Teams app"** मध्ये उपलब्ध असलेल्या **"Chat"** पर्यायाद्वारे आयोगाच्या आयटी टीमला कार्यवाही दरम्यान कळवली जाईल. त्यासाठी आयोगाच्या आयटी टीमला व्हाईस कॉल, एसएमएस, व्हॉट्स अॅप द्वारे देखील संपर्क साधता येईल (परिशिष्ट – ए मध्ये संपर्काचा तपशील नमूद केला आहे).

२.७ ई-सुनावणीच्या सुरळीत आणि विनाव्यत्यय अनुभवासाठी, ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग माध्यम 'Microsoft Teams app' तसेच येथे देण्यात आलेल्या आणि वेळोवेळी जारी केल्या जाऊ शकणाऱ्या कार्यप्रणालीच्या मार्गदर्शक सूचनांशी देखील स्वतःला परिचित करुन घ्यावे.

२.८ याचिकाकर्ता, प्रतिवादी आणि हस्तक्षेपकर्ता (असल्यास) यांची बाजू मांडणाऱ्या ॲडव्होकेट्स/पक्षकारांना ई-सुनावणी सॉफ्टवेअर माध्यमाच्या वापराशी आणि त्याच्या वैशिष्ट्यांशी परिचित होण्यासाठी ई-सुनावणीच्या एक किंवा दोन दिवस आधी (आयोगाच्या अधिकाऱ्यांद्वारे) टेस्ट-रन (ट्रायल ऑफ ई-हियरींग) घेण्यात येईल. टेस्ट-रनचा तपशील **परिशिष्ट-डी** मध्ये देण्यात आला आहे.

३. ई-सुनावणीची व्यवस्थाः

३.१ ज्या ॲडव्होकेट्स/पक्षकारांची प्रकरणे विशिष्ट दिवशी सूचीबध्द केलेली असतील फक्त त्यांनाच ई-सुनावणी माध्यमाद्वारे सादरकर्ता दर्जा आणि संबंधित अधिकार देण्यात येईल - अशा ॲडव्होकेट्स/पक्षकारांना दृक-श्राव्य इनपुट प्रदान करण्याचे अधिकार देण्यात येतील. संबंधित पक्षकांराच्या ॲडव्होकट्ससह जास्तीत जास्त ३ व्यक्तींना ई-सुनावणीमध्ये सहभागी होण्याची परवानगी देण्यात येईल.

३.२ ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी त्यांची संबंधित उपकरणे/मायक्रोफोन सर्व काळ 'बंद' ठेवावेत आणि जेव्हा त्यांचे म्हणणे मांडण्याची किंवा हस्तक्षेप करण्याची वेळ येईल तेव्हाच फक्त अशी उपकरणे/मायक्रोफोन 'चालू' करावेत. ॲडव्होकेट्स/पक्षकार यांनी हस्तक्षेप करणे पूर्णपणे टाळावे आणि अत्यावश्यक असेल तेव्हाच फक्त आयोगाच्या परवानगीने त्यांनी तसे करावे.

३.३ आयोग जेव्हा प्रश्न/मुद्दे उपस्थित करील तेव्हा, संबंधित ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी संयम राखावा आणि आयोगाने त्यांचे प्रश्न/मुद्दे पूर्ण मांडल्यानंतरच प्रतिसाद द्यावा. आयोगाने संपूर्ण प्रश्न नमूद केल्यानंतर संबंधित ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी त्यावर प्रतिसाद देण्यासाठी काही सेकंद वाट पाहावी.

३.४ आयोगाने विहित केलेली वेळ ॲडव्होकेट्स/पक्षकार यांनी पाळावी.

३.५ कार्यवाहीस प्रारंभ होण्यापूर्वी १५ मिनिटे आधी, नेटवर्कच्या जोडणीची स्थिरता आणि स्पष्टतेची खात्री करण्यासाठी आयोगाच्या आयटी टीमने केलेल्या टेस्ट व्हिडिओ-कॉलमध्ये ई-सुनावणीमध्ये भाग घेणाऱ्या ॲडव्होकेट्स/पक्षकारांनी सहभागी व्हावे.

३.६ ॲडव्होकेट्स/पक्षकार आयोगाच्या सचिवाच्या अधिकृत ई-मेलवर उपस्थित राहणाऱ्या ॲडव्होकेट्स/पक्षकारांचा ई-मेल आयडी आणि अन्य संबंधित तपशील आगाऊ पाठवतील.

३.७ ई-सुनावणीचे अंशतः किंवा पूर्णतः ध्वनीमुद्रण करण्यास सक्त मनाई आहे. ई-सुनावणीची कोणतीही कार्यवाही, किंवा त्याचा भाग प्रसारीत करण्यात येणार नाही किंवा कॉन्सिल, ॲडव्होकेट्स, याचिकाकर्ते, सामान्य जनता, पत्रकार इ. द्वारे प्रकाशनासाठी प्रसारित केला जाणार नाही किंवा प्रसारमाध्यमांकडे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस पुनःसादर करण्यात येणार नाही. या ताकदीचे उल्लंघन केल्यास कठोरपणे आणि कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

३.८ ई-सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग माध्यमाचे एकूण नियंत्रण आणि प्रशासकीय हक्क, आयोगाच्या सूचनांच्या अधीन राहून, आयोगाचे सचिव/आयटी टीम/निर्देशित अधिकारी यांच्याकडे असतील.

३.९ आयोग, ई-सुनावणी कार्यवाही सुरळीतपणे पार पाडण्यामध्ये अडथळा आणणाऱ्या व्यक्तीस काढून टाकण्याचे निर्देश, आयटी प्रशासकाला देईल.

३.१० **परिशिष्ट - सी** मध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (ई-सुनावणी) साठी 'Microsoft Teams app'च्या वापरासाठीची प्रमाण परिचालन कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे.

४. दस्तऐवज सादर करण्यासाठी कार्यपध्दती :

४.१ याचिकाकर्ता/प्रतिवादी/पक्षकार ई-सुनावणी दरम्यान आयोगाच्या निदर्शनास आणणे आवश्यक असलेल्या प्रश्नाबाबतचे संबंधित दस्तऐवज, अनुक्रमणिका, सलग पृष्ठांकन, चिन्हांकनासह, doc आणि pdf स्वरुपात, आगाऊ सादर करतील आणि सुनावणीच्या दिनांकाआधी ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. वर नमूद केलेल्या स्वरुपात न दिलेले दस्तऐवज आयोगाकडून विचारात घेण्यात येणार नाहीत.

४.२ याचिकाकर्ता/प्रतिवादी/पक्षकार संबंधित दस्तऐवज ई-फायलिंग पोर्टलवर अनुक्रमणिका, सलग पृष्ठांकन, चिन्हांकनासह, doc आणि pdf स्वरुपात, आगाऊ सादर करतील.

५. सुनावण्या आयोजित करणेः

५.१ पक्षकारांनी "Chat" विण्डोमध्ये "कार्यवाही समाधानकारकपणे पार पडली/पूर्ण झाली (जसे असेल तसे)" असे लेखी घोषणापत्र देणे बंधनकारक राहील.

६. ई-सुनावण्यांच्या प्रमाणित प्रती जनतेला उपलब्ध करुन दिल्या जाणार नाहीतः

६.१ ई-सुनावण्यांच्या ऑडिओ/व्हिडिओ/रेकॉर्डिंग ॲडव्होकेट्स/व्यक्तीशः पक्षकार किंवा जनतेला उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

६.२ तथापि, ई-सुनावणीमध्ये दाखल केलेल्या संबंधित दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती, विहित शुल्क अदा करण्याच्या अधीन राहून, पक्षकार/अर्जदार/ ॲडव्होकेट्स/जनतेला उपलब्ध करुन देण्यात येतील.

७. ई-सुनावणी न्यायालयीन कार्यवाही आणि दंडाच्या तरतुदी लागू असणेः

७.१ भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २२८ नुसार, आयोगाच्या कामकाजात जर कोणीही हेतूपुरस्सर कोणताही उपमर्द केला किंवा व्यत्यय आणला, तर त्याला सहा महिन्यांपर्यत वाढू शकणाऱ्या मुदतीसाठी साध्या कारावासाची शिक्षा होईल किंवा दंड करण्यात येईल, जो रु.१,०००/-पर्यंत वाढू शकेल, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतील.

७.२ फौजदारी दंड संहिता, १९७३ च्या कलम ३४५ नुसार, जर कोणीही आयोगाच्या उपस्थितीत हेतूपुरस्सर उपमर्द केला किंवा कोणताही व्यत्त्यय आणला, तेव्हा आयोग अपराध्याला कोठडीत ठेवू शकेल आणि त्याच दिवशी खंडपीठ उठण्यापूर्वी कोणत्याही वेळी अपराधाची दखल घेऊ शकेल आणि अपराध्याला या कलमाखाली शिक्षा का होऊ नये याचे कारणे दाखविण्याची त्याला वाजवी संधी दिल्यानंतर, अपराध्याला रु. २००/- पेक्षा जास्त नसलेल्या दंडाची आणि दंड न भरल्यास, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल मात्र तत्पूर्वी असा दंड भरण्यात आला तर गोष्ट वेगळी.

७.३ आयोगाला जर, त्यास संदर्भ केलेल्या कोणत्याही प्रकरणी, या विनियमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीला दंड न भरल्याबद्दल कारावासाची शिक्षा देण्यात यावी असे वाटले तर, आयोग ते प्रकरण त्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवू शकेल आणि अशा दंडाधिकाऱ्यांसमोर अशा व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी जामीन द्यावा असे फर्मावू शकेल किंवा पुरेसा जामीन देण्यात आला नाही तर, अशा व्यक्तीला अशा दंडाधिकाऱ्याकडे बंदोबस्तात पाठवील.

## परिशिष्ट - ए

| परिशिष्ट – ए कालमर्यादेकरिता प्रोटोकॉल | | | |
|---|---|---|---|
| **अनु.क्र.** | **कार्य** | **कालमर्यादा** | **तपशील** |
| १ | प्रकरणांचे वेळापत्रक ठरवणे आणि आयोगाच्या संकेत-स्थळावर प्रसिध्द करणे | आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार | |
| २ | पक्षकारांनी ई-सुनावणीस हजर राहणाऱ्या व्यक्तींची नावे आयोगाच्या लीगल टीमकडे देणे | ई-सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या दोन दिवस आधी | आयोगाच्या संपर्काचा तपशील - (आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात आला आहे. ) |
| ३ | आयोगाच्या आयटी टीमने पक्षकारांना ई-मेलवर मिटींगचा तपशील देणे | ई-सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या एक किंवा दोन दिवस आधी | आयोगाच्या संपर्काचा तपशील - (आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात आला आहे. ) |

## परिशिष्ट-बी

| परिशिष्ट - बी ई-सुनावणीचा प्रोटोकॉल (सुनावणीपूर्वी) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अनु.क्र.** | | **ऑडिओ** | | **व्हिडिओ** | |
| १ | ई-सुनावणीच्या आधी ४५ मिनिटे | आयोगाची आयटी टीम जॉईन करेल | ऑन | ऑफ | कनेक्शनसाठी तपासणी |
| | नोडल अधिकारी जॉईन करेल | ऑन | | ऑफ | |
| | लीगल टीम जॉईन करेल | ऑन | | ऑफ | |
| २ | ई-सुनावणीच्या आधी ४५ मिनिटे | आयोगाची आयटी टीम | ऑन | ऑफ | कनेक्शनसाठी तपासणी |
| | नोडल अधिकारी | ऑफ | | ऑफ | |
| | लीगल टीम | ऑफ | | ऑफ | |
| | आयोगाचे कार्यकारी संचालक, संचालक जॉईन करतील | ऑन | | ऑन | |
| | सर्व ॲडव्होकेट्स आणि याचिकाकर्ते आणि प्रतिवादी जॉईन करतील | ऑन | | ऑन | |
| ३ | मिटींगच्या आधी १५ मिनिटे | आयोगाची आयटी टीम | ऑन | ऑफ | ई-सुनावणीच्या आधी ४५ मिनिटे |
| | नोडल अधिकारी | ऑफ | | ऑफ | |
| | आयोगाचे कार्यकारी संचालक, संचालक, लीगल टीम | ऑफ | | ऑफ | |
| | सर्व ॲडव्होकेट्स | ऑफ | | ऑफ | |
| | मा. सचिव जॉईन करतील | ऑन | | ऑन | |
| ४ | मिटींगच्या आधी ५ मिनिटे | आयोगाची आयटी टीम | ऑन | ऑफ | सुनावणीच्या आधी ४५ मिनिटे |
| | नोडल अधिकारी | ऑफ | | ऑफ | |
| | आयोगाचे कार्यकारी संचालक, संचालक आणि लीगल टीम | ऑफ | | ऑफ | |
| | सर्व ॲडव्होकेट्स | ऑफ | | ऑफ | |
| | मा. अध्यक्ष आणि सदस्य जॉईन करतील | ऑन | | ऑन | |

| ई-सुनावणीचा प्रोटोकॉल (सुनावणीदरम्यान) | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | | **ऑडिओ** | **व्हिडिओ** |
| १ | अध्यक्ष | ऑन | ऑन |
| २ | सदस्य | ऑन | ऑन |
| ३ | सचिव | ऑफ | ऑफ |
| ४ | नोडल अधिकारी | ऑफ | ऑफ |
| ५ | लीगल आणि आयटी टीम | ऑफ | ऑफ |
| ६ | पक्षकार स्वतः/याचिकाकर्ता/प्रतिवादीचा ॲडव्होकेट्स (जो सादरकर्ता असेल ) | ऑन | ऑन |
| ७ | अन्य ॲडव्होकेट्स / प्रतिनिधी | ऑफ | ऑफ |

## परिशिष्ट - सी

## व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुनावणीसाठी (ई-सुनावणी) 'मायक्रोसॉफ्ट टीम्स'च्या वापराकरिता प्रमाण परिचालन कार्यपध्दती

आयोगाने (मविनिआ) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व प्रकरणांच्या सुनावण्यांसाठी "Microsoft Teams app" हे सॉफ्टवेअर (येथून पुढे त्यास टीम्स संबोधले जाईल) वापरण्याचा निर्णय घेतला आहे. 'मायक्रोसॉफ्ट टीम्स'चा वापर करुन ई-सुनावणीमध्ये सहभाग घेण्यास सहाय्य करण्याकरिता ही नियमपुस्तिका तयार करण्यात आली आहे.

### प्रारंभिक टप्पे

ई-सुनावणीमध्ये 'मायक्रोसॉफ्ट टीम्स ॲप'चा वापर करुन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे यशस्वीरित्या सामील होणे पक्षकारांकडे उपलब्ध असलेल्या सुविधा तसेच त्यांच्याशी जुळवून घेण्याची त्यांची इच्छा यावर अवलंबून आहे. ई-सुनावणीसाठी 'टीम्स ॲप'चा वापर करण्यासाठी खालील प्रक्रियेचे पालन करावे -

१. आयोग मायक्रोसॉफ्ट टीम्सद्वारे ई-सुनावणीमध्ये सहभाग घेण्यासाठी आमंत्रण लिंक (invitation link) पाठविल.

२. मायक्रोसॉफ्ट टीम्सवरुन मिटींग/सुनावणीमध्ये सामील होण्याची पध्दती खाली देण्यात आली आहे.

३. ई-सुनावणीच्या एक किंवा दोन दिवस आधी टेस्ट-रन (ट्रायल) टीम्स मिटींग घेण्यात येईल, जेणेकरुन पक्षकार 'मायक्रोसॉफ्ट टीम्स सॉफ्टवेअर'शी परिचित होऊ शकतील. **परिशिष्ट–डी** मध्ये टेस्ट-रन (ट्रायल)चा तपशील देण्यात आला आहे.

### ई-सुनावणीमध्ये सामील होण्यासाठी सूचना

१. आयोगाकडून वेबवर आधारित व्हिडिओ-कॉन्फरन्सिंग प्रणालीद्वारे प्रकरणांची सुनावणी घेण्यात येईल याची पक्षकारांनी नोंद घ्यावी.

२. ई-सुनावणी सुरळीतपणे पार पडणे दूरस्थ वापरकर्त्यांकडे (रिमोट ॲक्सेस) उपलब्ध असलेल्या कनेक्टिव्हिटीवर (सिग्नल-स्टैन्थ/बँडविड्थ) अवलंबून असते आणि त्यामुळे ई-सुनावणीमध्ये सामील होणाऱ्या पक्षकाराने त्यांच्याकडे चांगली कनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ असल्याची खातरजमा करावी, या सबंधात पक्षकार किमान २ mbps /समर्पित ४G data कनेक्शन वापरु शकतात.

३. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मायक्रोसॉफ्ट टीम्स ॲपवर ई-सुनावणी चालू असताना पक्षकारांनी त्यांच्या संगणक/लॅपटॉपवर (प्राधान्याने) दुसरे उपकरण किंवा ॲप्लिकेशन जोडण्यात आलेले नाही किंवा बँडविड्थचा वापर करीत नसल्याची खात्री करावी.

४. सुलभ वापरासाठी, पक्षकारांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मोडद्वारे प्रकरणांच्या ई-सुनावणीच्या संबंधात खालील प्रमाण परिचालन कार्यपध्दतीशी स्वतःला अवगत करावे.

ए. मायक्रोसॉफ्ट टीम्स ॲपवर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये सामील होण्यासाठी पक्षकारांनी त्यांच्या लॅपटॉप किंवा डेक्सटॉपवर प्राप्त झालेल्या **'Join live event'** या लिंकवर क्लिक करणे आवश्यक आहे.

Microsoft Teams

Join live event


Join as producer or presenter when it's time for the live event.
Do not forward this invite to the attendees.

Producer help | Presenter help | Learn more

Manage live event resources


पेजवर नेण्यासाठी तुमच्या मिटींग इनव्हाईटमधील **Join live event** चा पर्याय निवडा, जेथे तुम्ही '**Download the Windows App**' किंवा 'Watch on the web instead' या दोहोंपैकी एक पर्याय निवडू शकता. आपण '**Download the Windows App**' वर क्लिक करावे अशी याद्वारे आपणास विनंती करण्यात येते. जर आपणाकडे टीम्स ॲप आधीच असेल, तर मिटींग 'टीम्स ॲप्स'मध्ये सुरु होईल.

बी. '**Download the Windows App**' या बटनवर क्लिक केल्यावर '**Microsoft Teams app**' डाउनलोड होईल.




सी. टीम्स ॲप डाउनलोड झाल्यानंतर आयोगाच्या आयटी टीमने दिलेल्या युजरनेम आणि पासवर्डचा वापर करुन लॉग इन करावे.

डी. वेब मुखपृष्ठाच्या डाव्या बाजूच्या नामपट्टीवरील दिनदर्शिका (कॅलेण्डर) प्रतिमेवर क्लिक करावे. या दिनदर्शिकेमध्ये, नियोजित केलेले कार्यक्रम/ई-सुनावणी याबाबतची माहिती प्रदर्शित होईल. त्यावर डबल क्लिक करावे आणि खाली स्क्रीन प्रदर्शित होईल. खालील चित्रात दाखविल्यानुसार 'जॉईन' वर क्लिक करुन मिटींगमध्ये सामील व्हावे.




इ. Join बटनवर क्लिक केल्यावर खालील चित्रात दाखविल्यानुसार विण्डो प्रदर्शित होईल. पक्षकाराने कॅमेरा आणि माईक 'बंद' असल्याची खातरजमा करावी आणि त्यानंतर **'Join now'** बटनवर क्लिक करणे आवश्यक आहे.




एफ. **'Join now'** बटनवर क्लिक केल्यावर, वरील टप्प्यांप्रमाणेच, पक्षकार ई-सुनावणीमध्ये सामील होऊ शकेल.

जी. ई-सुनावणीमध्ये सामील झाल्यावर, युक्तिवाद करणारा कॉन्सिलर/पक्षकार प्रश्न विचारण्यात आल्यानंतर आयोगाच्या सूचनेची प्रतिक्षा करील. त्यानंतर स्व-परिचय देईल आणि पक्षकार त्याचे निवेदन मांडू शकेल. निवेदन पूर्ण झाल्यानंतर, संबंधित उपकरणाचा माईक त्वरित 'बंद' ठेवेल. जर

आयोगाला पक्षकाराकडून आणखी निवेदन/निवेदनांची आवश्यकता वाटल्यास, पक्षकार पुन्हा त्यांच्या उपकरणाचा माईक ‘चालू’ करु शकेल आणि निवेदन पूर्ण झाल्यानंतर माईक ‘बंद’ करेल.

एच. पक्षकारांनी त्यांचे माईक, आयोगाने त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास सांगितल्यास त्याचा अपवाद वगळता, सर्व काळ ‘बंद’ ठेवणे महत्वाचे आहे. अशा रीतीने एखादा पक्षकार आपले निवेदन मांडत असताना, अन्य सर्व सहभागी त्यांचे माईक ‘बंद’ ठेवणे अत्यावश्यक आहे, असे न झाल्यास स्पीकर्समधून येणारा आवाज माईकद्वारे पकडण्याची आणि प्रतिध्वनी/व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता वाढते आणि त्यामुळे ई-सुनावणीमध्ये अडथळा येऊ शकतो.

आय. एकाच पक्षकाराने एकाच वेळी एका पेक्षा जास्त निवेदने मांडणे टाळावे आणि प्रत्येक पक्षकाराने त्यांचे निवेदन मांडण्यासाठीच्या वेळेची किंवा आयोगाच्या परवानगीची संयमपूर्वक प्रतिक्षा करावी. आयोगाने परवानगी दिल्यानंतर, पक्षकाराने प्रथम माईक चालू करावा आणि त्यानंतर वरील खंड ‘एच’ नुसार निवेदन मांडावे.

जे. ई-सुनावणी दरम्यान, पक्षकारांनी कृपया ध्यानात ठेवावे की, ते न्यायालयीन कामकाजात भाग घेत आहेत आणि त्यामुळे ते कोणत्याही असभ्य वर्तनाचा किंवा पेहरावाचा किंवा टिप्पणीचा अवलंब करणार नाहीत. त्याशिवाय, आयोगासमोरील सुनावणी आणि कार्यवाहीचे पक्षकारांनी ध्वनीमुद्रण/प्रतिलिपीकरण/संचयन आणि/किंवा प्रसारण या साधनांद्वारे, कोणत्याही स्वरुपात, ध्वनीमुद्रीत/संचयित किंवा प्रसारित केले जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे, तसे करणे निःसंदिग्धपणे प्रतिबंधित आहे.

के. आयोगाने त्यांच्या प्रकरणाची सुनावणी पूर्ण करेपर्यंत पक्षकारांनी ऑनलाईन राहणे आवश्यक आहे. दूरस्थ वापरकर्त्याची कनेक्टिव्हिटी तुटल्यास, दूरस्थ वापरकर्ता त्यांच्या ई-मेलवर प्राप्त झालेल्या इन्व्हिटेशन लिंकद्वारे ई-सुनावणीमध्ये पुन्हा सामील होऊ शकतो किंवा व्हाईस कॉल, एसएमएस, व्हॉट्स ॲप, ई-मेल इ. सह अन्य साधनांद्वारे आयोगाच्या आयटी टीमशी संपर्क साधू शकतो. आयोगाची आयटी टीम चॅट बॉक्समध्ये तसा उल्लेख करुन आयोगाला त्याबाबत त्वरित कळविल.

एल. जर सर्व्हरमधील कोणत्याही अनपेक्षित आणि अपरिहार्य तांत्रिक समस्येमुळे कनेक्टिव्हिटी लिंक तुटल्यास, आयोग सुनावणी स्थगित करील आणि पक्षकारांना त्याबाबत ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. आयटी टीमकडून समस्येचे निराकरण झाल्यानंतर, आयोगास सोयीस्कर असलेल्या दिनांक आणि वेळेनुसार, आयोग, सुनावणीचे पुनर्नियोजन करील आणि त्यानुसार पक्षकारांना ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

एम. आयोगाचे अधिकारी प्रत्यक्ष ई-सुनावणीच्या दिनांकापूर्वी टेस्ट रनसाठी कोणत्याही पक्षकाराला कॉल करु शकतात आणि अशा प्रत्येक पक्षकाराने अशा कर्मचारी/अधिकाऱ्याला सहकार्य करणे आणि त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, जेणेकरुन व्हिडिओ-कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी सुरळीपणे पार पडेल.

एन.   सादरकर्ता तपशीलवार स्पष्टीकरण देण्यासाठी दस्तऐवज स्क्रीनवर दाखविल. आयोगाकडे आधी सादर केलेल्या अनुक्रमणिका/पृष्ठांकन असलेल्या दस्तऐवजांमधून असा तपशील दाखविण्यात येईल, जो सुलभरित्या शोधण्यासाठी चिन्हांकित (बुकमार्क) करण्यात आलेला असेल.

ई-सुनावणीचे लाईव्ह स्ट्रमिंगः

१.   आयोगाच्या https://www.merc.gov.in या संकेत-स्थळावर लिंक प्रदर्शित करुन लाईव्ह स्ट्रीमिंग करण्यात येईल. सामान्य जनता, ई-सुनावणीच्या कार्यवाहीस उपस्थित राहण्याचे हक्क डाउनलोड न करता, निनावी उपयोगकर्ता म्हणून लाईव्ह स्ट्रीमिंग सत्रात सामील होऊ शकते. ते त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या “Q & A” टॅबद्वारे त्यांच्या शंका/प्रश्न मांडू शकतात. “Q & A” द्वारे उपस्थित केलेल्या शंकांची उत्तरे ऑनलाईन देण्यात येतील.

परंतु असे की, “Q & A” वर उपस्थित केलेल्या शंका विशिष्ट प्रकरणाशी संबंधित आणि उचित अर्जासह प्रकरणामध्ये हस्तक्षेप करण्याच्या संदर्भात असाव्यात. “Q & A” द्वारे उपस्थित केलेल्या प्रत्येक किंवा असंबंध्द शंका/प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक असणार नाही.

२.   लाईव्ह स्ट्रीमिंगमध्ये ३ जणांच्या भूमिका महत्वाच्या आहेतः

१. निर्माता (जो लाईव्ह स्ट्रिमिंगचे प्रायोजन करील आणि त्याचे नियंत्रण करील - आयटी प्रशासन)

२. सादरकर्ता (जो निवेदन मांडेल - वकील / पक्षकार)

३. नियंत्रक (जो “Q & A” वर प्राप्त झालेल्या प्रश्नांचे संनियंत्रण करील आणि त्यास प्रतिसाद देईल – लीगल टीम

**निर्माता :** प्रशासक/निर्माता लाईव्ह स्ट्रीमिंग होस्ट करतील आणि सुनावणीमध्ये सहभागींना (ई-मेल प्राप्त झालेल्या विनंतीनुसार) सामील करुन घेतील. निर्माता सुनावणीचे थेट स्क्रीनवर प्रदर्शित करण्याचे नियंत्रण करतो. निर्माता सादरकर्त्यांची स्क्रिन दाखवू शकतो (कोणतेही निवेदन/सादरीकरण करुन) किंवा स्क्रीनवर ॲक्टिव्ह वापरकर्ता दाखवू शकतो.

**सादरकर्ताः** आयोगाच्या परवानगीनंतर, वकील/पक्षकार दस्तऐवज दाखवू शकतील/स्क्रीन शेअरींगच्या माध्यमातून सादरीकरण दाखवू शकतील.

**नियंत्रकः** आयोगाचा विधी अधिकारी लाईव्ह सुनावणीमध्ये नियंत्रक म्हणून कार्य करील. नियंत्रक “Q & A” टॅबवर कुणाला काही बोलायचे / सादर करायचे आहे का असे सूचित करेल, त्यानंतर सर्वप्रथम त्याला (निनावी वापरकर्त्यास) “Q & A” टॅबवर त्याचा संपर्काचा तपशील ( नाव, ई-मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक) द्यावा लागेल. नियंत्रक “Q & A” विभागाद्वारे प्राप्त झालेल्या सर्व शंका/प्रश्न तपासेल आणि संबंधित शंका प्रदर्शित करील, ज्या ई-सुनावणीमधील प्रत्येक जण पाहू शकेल (यास निनावी वापरकर्ता या लिंकवरुन सामील होणाऱ्या व्यक्तींचा अपवाद).

## परिशिष्ट – ड
## पक्षकारांसाठी टेस्ट-रन

इलेक्ट्रॉनिक सुनावणी संबंधातील कोणतीही अडचण दूर करण्यासाठी आयोगाच्या विधी आणि आयटी टीमद्वारे टेस्ट-रन आयोजित करण्यात येईल.

यामध्ये ज्या विशिष्ट गोष्टी समाविष्ट करण्यात येतील त्या पुढीलप्रमाणेः

- दूरस्थ वापरकर्त्याकडील आणि आयोगाकडील व्हिडिओ चित्रण आणि ध्वनीमुद्रणाच्या दर्जाच्या गुणवत्तेची पाहणी करणे.
- वापरकर्ता सॉफ्टवेअरशी सामान्यतः परिचित असल्याची आणि कोण बोलत आहे याच्या आधारावर स्क्रीन कशी बदलेल याची खात्री करणे.
- सुनावणीमध्ये सहभाग घेणाऱ्या व्यक्तींना फाईल सामायिक करण्यासाठी/सादर करण्यासाठी वापरावयाच्या “Chat” आणि “Screen Sharing” चा परिचय करुन देणे.

## परिशिष्ट - इ

## ई-सुनावणीमध्ये भाग घेणा-या व्यक्तींसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

१. मोबाईलवर (Android and iOS) टीम्स ॲप्सची संपूर्ण वैशिष्ट्ये उपलब्ध नसल्यामुळे सुरळीत ई-सुनावणीसाठी डेस्कटॉप/लॅपटॉप/आयपॅडचा वापर करणे श्रेयस्कर ठरेल.

२. ब्राउजरद्वारे सामील होणाऱ्या उपस्थितांनी Google Chrome, Firefox etc. या सारख्या ब्राउजरच्या अलीकडच्या आवृत्तीचा वापर करावा.

३. ई-सुनावणीमध्ये भाग घेणाऱ्या व्यक्तींनी इयरफोन/मायक्रोफोनचा वापर करावा. 'Hands free mode'च्या वापर करु नये.

४. मायक्रोफोन हलवू नये किंवा पकडून ठेवू नये.

५. पक्षकारांनी त्यांचे माईक, आयोगाने त्यांना त्यांचे म्हणणे मांडावयास सांगितल्यास त्याचा अपवाद वगळता, सर्व काळ बंद ठेवावेत.

६. मायक्रोफोनवर कागद/वस्तू ठेवणे टाळावे.

७. वक्ता बोलताना कॅमेरा त्याच्यावर केंद्रीत करावा.

८. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुरु होण्याआधी सादरीकरणाची चाचणी घ्यावी.

९. कॅमेराच्या दृष्टीक्षेपात अन्न किंवा पेय आणणे टाळावे.

१०. आयोग, आपल्या स्वेच्छाधिकारात आणि सुनावणीसाठीच्या याचिकेवर अवलंबून, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणीचे लाईव्ह स्ट्रीमिंग करु शकते. आयोगाने सुनावणीचे लाईव्ह स्ट्रीमिंग करण्याचा निर्णय घेतल्यास आयोगाच्या संकेत-स्थळावर त्याची लिंक देण्यात येईल.

११. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ई-सुनावणी चालू असताना, पक्षकारांनी कृपया ध्यानात ठेवावे की, ते न्यायालयीन कामकाजात भाग घेत आहेत आणि त्यामुळे ते कोणत्याही असभ्य वर्तनाचा किंवा पेहरावाचा किंवा टिप्पणीचा अवलंब करणार नाहीत. त्याशिवाय, आयोगासमोरील सुनावणी आणि कार्यवाहीचे पक्षकारांनी ध्वनीमुद्रण/प्रतिलिपीकरण/संचयन आणि/किंवा प्रसारण या साधनांद्वारे, कोणत्याही स्वरुपात, ध्वनीमुद्रीत/संचयित किंवा प्रसारित केले जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे, तसे करणे निःसंदिग्धपणे प्रतिबंधित आहे.

१२. आयोगाने त्यांच्या प्रकरणाची सुनावणी पूर्ण करेपर्यंत पक्षकारांनी ऑनलाईन राहणे आवश्यक आहे, त्यानंतर पक्षकार व्हिडिओ-कॉन्फरन्सिंगमधून बाहेर पडू शकतात.

१३. सुनावणीच्या प्रकरणांचे वेळापत्रक प्रसिध्द केल्यानंतर, आयोगाचा नोंदणी विभाग कोणत्याही पक्षकाराला कॉल करु शकतो आणि त्यांच्या उपकरणाची किंवा त्याच्या कनेक्टिव्हिटीची चाचणी करणे आवश्यक ठरवू शकतो, आणि अशा प्रत्येक पक्षकाराने अशा कर्मचारी/अधिकाऱ्याला सहकार्य करणे आणि त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, जेणेकरुन सुनावणी व्हिडिओ-कॉन्फरन्सिंगद्वारे सुरळीपणे पार पडेल.

१४. सुनावणीच्या प्रकरणांचे वेळापत्रक प्रसिध्द केल्यानंतर, प्रकरणांच्या सुनावणीपूर्वी आयोगाकडून व्हॉट्स ॲप ग्रुप बनविण्यात येऊ शकेल, ज्यामध्ये सहभागी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या संबंधात कोणतेही प्रश्न विचारु शकतात. त्याशिवाय, पक्षकार जॉईनिंग आणि टीम्स ॲपच्या संबंधातील प्रश्नांसाठी आयटी टीमशी आणि दस्तऐवजांच्या संबंधातील प्रश्नांसाठी लीगल टीमशी आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात आलेल्या संपर्काच्या तपशीलाद्वारे ई-सुनावणी हेल्पलाईनवर संपर्क साधू शकतात.